सन २०१६-१७ मध्ये रायगड जिल्हयातील समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्थेसाठी सामुग्री पुरविण्यासाठी वितरीत केलेल्या निधीमधून शिल्लक राहिलेला निधी खर्च करण्यास मंजुरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : टीडीएस २०१७/११/प्र.क्र.१०३७/पर्यटन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ०६ मार्च, २०१८.

संदर्भ: १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य, क्रमांक- टिडीएस २०१६/६/प्र.क्र.४१४ (भाग-१)/पर्यटन, दिनांक २०.७.२०१६.
२) जिल्हाधिकारी, रायगड यांचे पत्र क्रमांक- साशा/ब-५(१)/जिआव्याप्रा/पर्यटक सुरक्षा/२०१७, दिनांक १६.११.२०१७.

शासन निर्णय :

संदर्भ क्रमांक- १ येथील शासन निर्णयान्वये रायगड जिल्ह्यातील एकूण २४ समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी रुपये ७८,०६,१००/- इतका निधी जिल्हाधिकारी, रायगड यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील निर्देशानुसार साहित्य खरेदीसाठी ई-निविदा पध्दती अबलंबविल्यामुळे निश्चित दरापेक्षा कमी दर उपलब्ध झाल्याने साहित्य खरेदीचा खर्च कमी झाला आहे. त्यामुळे उपलब्ध करुन दिलेल्या रुपये ७८,०६,१००/- निधीमधून रुपये ८,६८,८९५/- इतका निधी शिल्लक राहिला आहे.

२. जिल्हाधिकारी, रायगड यांनी संदर्भ क्रमांक- २ येथील पत्रान्वये शिल्लक राहिलेल्या रुपये ८,६८,८९५/- इतक्या निधीमधून मांडवा, किहिम, आक्षी, नागाव, रेवदंडा, कोर्लई, काशिद व हरिहरेश्वर या ८ ग्रामपंचायतींच्या समुद्र किनाऱ्यांवर रेस्क्यु ट्युब, रेस्क्यु फॅन, सर्फ रेस्क्यु बोर्ड, वॉकी टॉकी सेट, थ्री बॅग लाईफ गार्ड युनिफार्म इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी निधी खर्च करण्याच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. या अनुषंगाने शिल्लक राहिलेल्या रु.८,६८,८९५/- निधीमधून खालील प्रमाणे साहित्य खरेदीसाठी रु. ८,६८,०००/- खर्च करण्यास जिल्हाधिकारी, रायगड यांना मंजुरी देण्यात येत आहे.

अ. क्र.	साहित्याचे नाव	अंदाजित दर रुपये (प्रति नग)	बीचनिहाय आवश्यक नग संख्या	एकूण रुपये	एकूण नग (८ बीचेस करिता)	एकूण अंदाजित खर्च रुपये
१	रेस्क्यु टयुब	७५००	२	१५०००	१६	१२००००
२	रेस्क्यु कॅन	८०००	२	१६०००	१६	१२८०००
३	सर्फ रेस्क्यु बोर्ड	४००००	१	४००००	८	३२००००
४	वॉकी टॉकी सेट	१४१००	१	१४१००	८	११२८००
५	थ्रो बॅग	३९००	४	१५६००	३२	१२४८००
६	लाईफ गार्ड युनिफार्म	१९५०	४	७८००	३२	६२४००
	एकूण	**७५४५०**		**१०८५००**		**८६८०००**

३. सदर शासन निर्णयासाठी अटी व शर्ती संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०१८०३१५१०५५०९१८२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Ravindra Laxmikant Lakhote

Digitally signed by Ravindra Laxmikant Lakhote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ae5e5678dc8c9d9c01f7043448a53f6a9fbe81e46d183af43c9a9e01eb42c7c7, serialNumber=93c11f919f0c5fba6953b4841cc8cfd46b2b788da139e3f21b3d79d2cf976efa, cn=Ravindra Laxmikant Lakhote
Date: 2018.03.15 10:58:50 +05'30'

(र. ल. लखोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
५) महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरिक्षा व लेखा), मुंबई.
६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
७) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, रायगड.
८) जिल्हा नियोजन अधिकारी, रायगड.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड.
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२) नियोजन विभाग (कार्यासन-१४११/१४४४), मंत्रालय, मुंबई.
१३) वित्त विभाग (का.व्यय-१४/अर्थोपाय/अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई.
१४) अवर सचिव पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१५) निवड नस्ती/ पर्यटन.

***